<u>नियमित दिवाणी दावा क्र.१६२/२०२३ मध्ये निशाणी क्र.१३३ वर आदेश</u>

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादी व प्रतिवादी क्र.३ यांच्या विरूध्द निशाणी क्र.१२८ वर विना जबाब असा आदेश होण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. सदरचा दावा हा निशाणी क्र. ११५, ११७ व १२४ च्या आदेशाकामी तसेच निशाणी क्र.११३ च्या युक्तीवादाकामी प्रलंबित आहे. सदर दाव्यातील निशाणी क्र.१२८ वरील अर्जावर वादी तसेच प्रतिवादी क्र.३ यांनी अद्याप त्यांचे म्हणणे दिलेले नाही. तरी वादी आणि प्रतिवादी क्र.३ यांच्या विरूध्द विना जबाब असा आदेश पारित करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. सदर अर्जावर वादी व प्रतिवादी क्र.३ यांनी आपले म्हणणे दाखल करून हरकत घेतलेली आहे. वादींचे म्हणणे असे आहे की, वादींनी आज रोजी निशाणी क्र.१२८ वर त्यांचे म्हणणे दाखल केलेले असल्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.३ यांनी निशाणी क्र.१२८ वरील अर्जास त्यांचा जबाब दाखल केलेला आहे त्यामुळे प्रस्तुत अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचे तोंडी म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, वादी आणि प्रतिवादी क्र. ३ यांनी निशाणी क्र.१२८ वर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतो.

SACHIN HINDURAO KHADE

Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2025.12.10 11:24:08 +0530

सिन्नर.
दि.०९/१२/२०२५

(सचिन एच.खाडे)
दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,सिन्नर